# दीपकळीः 2020–21
## अहवाल

सत्र 2020–21 या वर्षीच्या दीपकळी वार्षिक अंकाची जबाबदारी माझ्यावर सोपविण्यात आली. कोरोना--लॉकडाऊनच्या पार्श्वभूमीवर यात अनेक अडचणी होत्या. तरीही वेगळ्या प्रकारे नियोजन करून अंतिम टप्पा गाठण्याचा प्रयत्न करण्यात आला. चारही भाषांची विषयनिहाय सूची तयार करणे, लिहिण्यासाठी विद्यार्थिनी तयार करणे, विषयावर लिहिण्यासाठी साहित्य उपलब्ध करून देणे, घरी नेऊन देणे, परत आणणे असे कामाचे स्वरूप राहिले. सर्वच विद्यार्थिनींनी दिलेल्या विषयावर लेखन केलेले आहे. कोरोना असूनही त्यांच्या उत्साहात कमी जाणवली नाही. जून महिन्यात लॉकडाउन प्रक्रिया शिथिल झाल्यावर प्रिंटींग प्रक्रिया सुरू झाली. प्रूफ रिडिंगचे कार्य सर्व संबंधित शिक्षकांनी विनाविलंब केले. तद्नंतर प्रिंटींग प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. इंग्रजीत 11, हिन्दीत 10, मराठीत 18, संस्कृतमध्ये 5, अशा एकूण 44 लेखांसह 38 मुलींनी सहभाग नोंदविला असून 150 पृष्ठांची दीपकळी आकारास आली आहे.

मागील वर्ष आपल्या इतिहासाच्या अनेक अजाणत्या आणि परस्पर विरोधी घटनांच्या स्मृतींचे वर्ष राहिले आहे. महाराष्ट्राने आपल्या निर्मितीची एकसष्ट वर्षे पूर्ण केलीत. आचार्य विनोबा भावे यांची 125वी जयंती, तसेच नेताजी सुभाषचंद्र बोस, फणीश्वरनाथ रेणू, शरच्चंद्र मुक्तिबोध, पी.व्ही.नरसिंहराव, शंकरराव चव्हाण, पं.भिमसेन जोशी, सत्यजित राय, आर.के. लक्ष्मण यांचे हे जन्मशताब्दी वर्ष होते. नागपूर कॉंग्रेस अधिवेशन, ऐतिहासिक माणगाव परिषद, अलिगढ़ मुस्लिम विद्यापीठ यांनी शंभर वर्षे पूर्ण केली तर संयुक्त राष्ट्रसंघ व पीपल्स एज्यूकेशन सोसायटीने अमृत महोत्सव साजरा केला. बॅकांचे राष्ट्रीयीकरण आणि भातुकलीच्या गाण्याने पन्नाशी पूर्ण केली असून आर्थिक उदारीकरणाची तीन दशके लोटली आहेत. या वर्षात माजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी, सुंदरलाल बहुगुणा, केशवानंद भारती, पं. जसराज, न्या.पी.बी.सावंत, विष्णुचंद शर्मा, मंगलेश डबराल, राहत इन्दौरी, एस.पी. बालासुब्रमण्यम, ऋषी कपूर, सरोज खान, राम–लक्ष्मण जोडीतील 'लक्ष्मण' यांचा आवाज नेहमीकरिता शांत झाला आहे.

अगदी या घटनांच्या बाजूला 2020च्या नोबेल पुरस्कारांनी ध्यान आकृष्ट केले. जागतिक अन्न कार्यक्रमाला शांततेचे नोबेल प्राप्त झाले. शिवाय एकदम चार महिलांना नोबेल प्राप्त होण्याबरोबरच इतिहासात पहिल्यांदा रसायनशास्त्रात दोन महिलांना एकसाथ नोबेल मिळण्याची नोंद झाली. मराठमोळ्या डिस्ले गुरुजींनी ग्लोबल पुरस्कार प्राप्त केला.

इतिहास आणि वर्तमानाच्या या नाजूक काळाला विद्यार्थिनींनी आपल्या तरूण लेखणीने स्पर्श केला आहे, या प्रश्नांच्या आसपास स्वतःला शोधण्याचा प्रयत्न केला आहे. व्हॉट्सअॅप आणि गोपनीयता, गलवान खोऱ्यातील भारत--चीन संघर्ष, ब्लॅक लाईव्हस मॅटर, न्यू नार्मल, नवीन

कृषि कायदे, नवीन शैक्षणिक धोरण आणि नागपूर मेट्रो इत्यादींना स्पर्श करण्याचे साहस केले आहे. माजी विद्यार्थिनींनी कोरोना काळातील अनुभव कथन केले आहेत.

या अंकाची जबाबदारी माजी कार्यकारी प्राचार्या मॅडम डॉ.लता गजभिये यांनी विश्वासाने माझ्यावर सोपविली, मी त्यांचा ऋणी आहे. तसेच कार्यकारी प्राचार्या मॅडम दीपश्री पाटील, उपप्राचार्य मॅडम डॉ.मराठे, पर्यवेक्षिका मॅडम प्रा.बरगे यांचा मी आभारी आहे. याशिवाय प्रा. मनोज कोसारे, डॉ.वीणा विराणी, डॉ.ज्योती बोथरा, सह–संपादक प्रा.अमर दामले यांचे हार्दिक आभार. डॉ.बसंत त्रिपाठी, डॉ.गोपाळ बैतुले, डॉ.एम.एस.वानखेडे, डॉ.चारूता जोशी, डॉ.राजश्री गजघाटे, प्रा.स्मिता पाणूरकर, डॉ.वैशाली उपाध्ये व प्रा.रूपा व्यास यांचे विशेष आभार. यांच्या सहकार्याशिवाय हे कार्य पूर्णत्वास जाणे अशक्यप्राय होते. या अंकासाठी लेखनकर्त्या विद्यार्थिनींचे आभार. सर्व शिक्षकेतर कर्मचारी, यश प्रिंटर्सचे श्री नरेंद्र गांधी, श्री विलासभाऊ व अमितभाऊ यांचे सहकार्यासाठी आभार. धन्यवाद.

- एकूण खर्च (2020–21) : रू. 29, 500=00
- मागील वर्षीचा खर्च (2019–20) : रू. 20, 060=00

(या वर्षी दीपकळीच्या 25 प्रती छापण्यात आल्या आहेत.)

**ज्ञानेश्वर शंभरकर**
प्रभारी प्राध्यापक
दीपकळी 2020–21


श्रीमती बिंझाणी महिला महाविद्यालय, नागपूर
दीपकळी
Date 28-09-2021 Time 12.30 pm